‘‘स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आंतरविद्याशाखीय पीएच.डी प्रबंधाचे आशय विश्लेषण’’

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

अंतर्गत

ग्रंथालय व माहितीशास्त्रातील पीएच.डी

पदवीसाठी सादर केलेला संशोधन अहवाल

संशोधक

गिणगिने व्यंकट मारोतीराव

मार्गदर्शक

डॉ रविंद्र ए.लाठकर

ग्रंथपाल

प्रतिभा निकेतन महाविद्यालय नांदेड

संशोधन केंद्र

माध्यमशास्त्र संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड.सन

२०२२

—:प्रस्तावना:—

संशोधन ही मानवाच्या कल्पनेपेक्षा बुध्दितत्वाला प्राधान्य देणारी अभिक्रिया आहे.कारण, या अभिक्रियेने संपूर्ण मानवी जीवन व्यापले आहे. शोधनाच्या प्रक्रियेनंतर संशोधनाची अभिक्रिया सुरु होते. म्हणून संशोधन क्षेत्रही एकसारखे असेलच असे नाही, जेथे—जेथे मानवी बुध्दी झेपावते,तेथे—तेथे त्याला प्रश्न पडतात त्याचे कुतूहल जागले जाते, काही मुलभूत अशा जीवनव्यहारातील समस्या त्याला जाणवू लागतात,त्यातूनच शोधनाला सुरुवात होते. संशोधकास सामग्रीचे आलोचन करताना वस्तुनिश्ठतेवर श्रध्दा ठेवून साधनांचे विश्लेषण करावे लागते. सत्याच्या आकलानाची प्रक्रिया ही परिश्रमपूर्वक अध्ययनातून स्पष्ट होते यासंदर्भात लॅरॉबी यांनी म्हटले आहे. सत्य केवळ आपल्या स्वत:साठीच नव्हे; तर सर्वासाठी सत्य असते यावर शास्त्रज्ञास निर्णय घेताना आत्मनिष्ठा व वैयक्तिक अशा दोन्ही बाजू दूर सारता आल्या पाहिजे विधांनांचे प्रामाण्य सिध्द होण्याइतकेच त्यांची प्रमेयता सिध्द होणे हेही संशोधनाच्या प्रगतीसाठी उपकारक आहे.

आजच्या गतिमान युगाबरोबर राहण्यासाठी होऊन गेलेल्या घटका विषयी,ज्ञान प्राप्त करुन घेणे काळाची गरज आहे.संशोधनातून काही घटकांची फलनिश्चिती होतान दिसून येते, परंतू होणा—या प्रबंधाचे आशय विश्लेषण केले तर आपण असे,समजू शकतो, म्हणून प्रसतूत विषयांच्या संशोधनासाठी संशोधकाने ‘स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आंतरविद्याशाखे अंतर्गत पीएच.डी प्रबंधाचे आशय विश्लेषण हा विषय निश्चित केला आहे.

विषय :—

‘‘स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आंतरविद्याशाखीय पीएच.डी.प्रबंधाचे आशय विश्लेषण’’

संशोधनाची गरज आणि महत्व :—

गेल्या दोन दशकातील आंतरविद्याशाखीय विषयामध्ये बदल होताना दिसून येत आहेत. संशोधनामधून विविध प्रकाराच्या समस्यांचे निराकरण करणे अभिप्रेत असते. मागील काही काळामध्ये आंतरविदयाशाखीय संशोधनाचा भर विशेषत:कोणत्या प्रकारसमस्या सोडविण्यावर होता ही बाब लक्षात आली तर मागील संशोधनाचा कल समजुन पुढील संशोधनाची दिशा ठरविता येउ शकते. आशय विश्लेषन हा संशोधनाचे विश्लेषन करून त्यादवारे संशोधनाची दिशा ठरविण्यासाठी उत्तम मार्ग आहे.आंतरविदयाशाखीय विविध विषयांमधील संशोधनात असणारे साम्य तसेच विविधता प्रस्तुत संशोधनादवारे लक्षात येउ शकते.विविध विषयांमधील संशोधन पदधती, तथ्य

संकलनाची साधने आणि तंत्रे, नमुना निवड,वापरण्यात येणार स्टाईल मॅन्युअल, सायटेशन्स इत्यादी घटकांवर एकत्रित व तुलनात्मक प्रकाश प्रस्तुत संशोधनादवारे टाकता येईल व त्यादवारे आंतरविदयाशाखीय विषयांमधील संशोधनाचा कल लक्षात घेता येउ शकेल.

संशोधनाची उदिष्टे :—

आंतरविद्याशाखा अंतर्गत येणा—या अभ्यासक्रम सामाजिक कार्य, शिक्षणशास्त्र,माध्यमशास्त्र, शारिरिक शिक्षण, ग्रथालय व माहितीशास्त्र, नाटयाशास्त्र, गृहशास्त्र या विषयामधील प्रबंधाचे आशय विश्लेषन करण्यासाठी प्रमुख उदिष्टे खालील प्रमाणे आहेत.

उदिष्टे :—

१आंतरविद्याशाखांमधील संशोधनविषयक बदलत्या प्रवाहांचा आंढावा घेणे.

२.आंतरविद्याशाखांमधील प्रबंधाचे संख्यात्मकदृष्टया विश्लेशण करणे.

३. सादर करण्यात आलेल्या प्रबंधांचे कालखंड, भौगोलीकदृष्टया व्याप्ती, लिंग,वापरण्यात आलेले सायटेशन्स इत्यादी घटकांच्या आधारे विश्लेषन करणे.

४.आंतरविद्याशाखांमधील प्रबंधांचे गुणात्मकदृष्टया विश्लेषण करणे.

५.प्रबंधांचे विषय,स्टाईल मॅन्युअल, पुर्व संशोधनविषयक आढावे (रिव्हयुज), तथ्य विश्लेषनासाठी वापरलेल्या आधुनिक आज्ञावली व इतर साधनांचा आढावा घेणे.

संशोधनाचे गृहितके:—

संशोधन हाती घेतल्यानंतर त्या संशोधनाची रुपरेषा करताना संशोधनाची गृहितके मांडावी लागतात ती पुढील प्रमाणे.

१ आंतरविद्याशाखांमधील शिक्षणशास्त्र या विषयामध्ये सादर केलेल्या पीएच.डी प्रबंधाचे प्रमाण सर्वाधिक आहे.

२ आंतरविद्याशाखेमध्ये पुरुष संशोधकांनी सादर केलेल्या व संशोधन मार्गदर्शन केलेल्या प्रबंधाचे प्रमाण जास्त आहे.

३ पीएच.डी प्रबंधांमध्ये मान्यताप्राप्त स्टाईल मॅन्युअलचा वापर केलेल्या प्रबंधाचे प्रमाण खुप कमी आहे.

४ संशोधकाने संदर्भासाठी वापरलेल्या साहित्यामध्ये नियतकालीकाचे प्रमाण सर्वाधिक आहे.

५ संख्यात्मक माहिती विश्लेषणामध्ये आधुनिक आज्ञावली व इतर साधनाचे उपयोजन अल्प प्रमाणात आहे.

व्याप्ती व मर्यादा :—

सदर संशोधनासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत आंतरविद्याशाखीय विषयातील मराठी भाषेतील सादर केलेल्या पीएच.डी प्रबंधाचा विचार करण्यात आलेला आहे.

कालखंड :—

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामध्ये आंतरविद्याशाखेतील १९९४ ते डिसेंबर २०२२ या कालखंडातील सादर झालेल्या प्रबंधांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

क्षेत्र :—

क्षेत्र व्याप्ती ही स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आंतर्गतविद्याशाखीय पीएच.डी प्रबंधापुरतीमर्यादीत आहे.

संशोधन कार्यपध्दती :—

सदर संशोधनामध्ये आंतरविद्याशाखीय प्रबंधांचा वर्णनात्मक संशोधन पध्दती वापरुन आशय विश्लेषण तंत्राच्या साहयाने अभ्यास केला जाणार आहे. या मध्ये संशोधन विषय व्याप्ती, उद्दिष्टे,संशोधन पध्दती, वापरलेली साधने,गृहितके आशय निष्कर्ष शिफारशी संदर्भ या घटकांचा समावेश केलेला आहे.

जनसंख्या व नमुना विवड :—

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामध्ये आंतरविद्याशाखेतील १९९४ ते डिसेंबर २०२२ कालखंडातील पीएच.डी संशोधन प्रबंध जनसंख्या म्हणून विचार केला जाणार आहे. यामध्ये जनसंख्या पुढीलप्रमाणे आहे.

आंतरविद्याशाखेतील मराठी भाषीक प्रबंधांची विषयनिहाय उपलब्धता

अ क्र	विषय	प्रबंधांची उपलब्धता
१	शिक्षणशास्त्र	१६८
२	माध्यमशास्त्र	१२
३	शारिरीक शिक्षण	१५१
४	समाजकार्य	२९
५	ग्रथालय आणि माहितीशास्त्र	३१
६	नाटयशास्त्र	३
७	गृहशास्त्र	२६
	एकुण	४२०

नमुना निवड:

उपलब्ध जनसंख्या किंवा प्रबंधांची संख्यात्मक तुलना केली असता त्यामध्ये खुप मोठा फरक पहावयास मिळतो. उपलब्ध ७ विषयांमध्ये शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षण या दोन विषयांमधील प्रबंधांची संख्या प्रतिविषय १५० पेक्षा जास्त आढळते व उर्वरीत विषयांमधील प्रबंध संख्या तुलनेने खुप कमी आहे. सदरील बाब लक्षात घेता संशोधकाने प्रस्तुत संशोधनामध्ये **सहेतुक किंवा उददेशपुर्ण नमुना निवड** केलेली आहे. ज्या विषयांमधील प्रबंध संख्या ४० पेक्षा कमी आहे त्या विषयांमधील सर्व प्रबंध अभ्यासासाठी विचारात घेतले जाणार आहेत. म्हणजेच शिक्षणशास्त्र व शारीरीक शिक्षण हे दोन विषय वगळता उर्वरीत पाच विषयांमधील जनसंख्या हीच नमुना असणार आहे तर उर्वरीत दोन विषयांमधील उपलब्ध प्रबंधांच्या **५०%**म्हणजेच अर्धे प्रबंध अभ्यासाठी विचारात घेतले जाणार आहेत. ते खालीलप्रमाणे आहे

अ क्र	विषय	प्रबंधांची उपलब्धता	निवडलेली नमुना संख्या
१	शिक्षणशास्त्र	१६८	८४
२	माध्यमशास्त्र	१२	१२
३	शारिरीक शिक्षण	१५१	७६
४	समाजकार्य	२९	२९
५	ग्रथालय आणि माहितीशास्त्र	३१	३१
६	नाटयशास्त्र	३	०३
७	गृहशास्त्र	२६	२६
	एकुण	४२०	२५१

थोडक्यात अंतरविद्याशाखेतील एकूण २५१ प्रबंधांचा वरील विषयनिहाय अभ्यास प्रस्तुत संशोधनात केला जाणार आहे.

संशोधन साधने:—

सदरील संशोधनासाठी पुढील साधनाचा उपयोग केला जाणार आहे.

१ . निरिक्षण

२ . पदनिश्चय श्रेणी

३ .आशय विश्लेषण

कालावधी :—

संशोधन प्रक्रिया समस्येपासून सूरु होते व अहवाल टंकलिखित करुन सादर करेपर्यतच्या कालावधीचे नियोजन यात करण्यात येते.मार्च२०२५ पर्यत संबंधित संशोधन हे पूर्ण करण्यात येईल.

समारोप :—

आंतरविदयाशाखेतील प्रबंधांचे आशय विश्लषन यादवारे आंतरविदयाशाखेतील संशोधनाच्या सदयस्थितीवर प्रकाश टाकण्यास मदत होणार आहे. या संशोधनातील पुढील दिशा ठरविण्यास सदर संशोधन मार्गदर्शक ठरणार आहे.

संशोधक | **मार्गदर्शक**

गिणगिनेव्यंकट मारोतीराव | डॉ.लाठकरआर.ए.

संशोधकांचे नांव	गिणगिने व्यंकट मारोतीराव
मोबाईल क्रमांक	९३०९९८८४१२
ई—मेल आयडी	vyankatgingine@gmail.com
प्रवर्ग	**NT-C**
विषयाचे नांव	ग्रथालय व माहितीशास्त्र
संशोधन विषय शिर्षक	‘‘स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आंतरविद्याशाखीय पीएच.डी प्रबंधाचे आशय विश्लेषण’’
मार्गदर्शकांचे नांव	आर.ए.लाठकर ग्रथपाल प्रतिभा निकेतन महाविद्यालय नांदेड ता.जि नांदेड
मार्गदर्शकांचा मोबाईल क्रमांक	९७६६५३१५६१
मार्गदर्शकांचा ई—मेल आयडी	ravilathkar2009@gmail.com

संदर्भसूची

१ कुंभार, राजेद्र(२००४)महाविद्यालयीन विद्यापीठीस ग्रथालय,य.च.म.मु.वि.नाशिक

२ कुंभार,कल्याण,(१९९३) ग्रथालय आणि माहितीशास्त्र,कैलास प्रकाशन,औरगाबाद

३ फडके, दना,(२०१२) ग्रथालय सगनकीकरण आाणी आधुनिकीकरण,युनिव्हर्सल प्रकाशन,पुणे

४ वरशिल, बी.डी. (२०१२) सायटेशन ॲनालिसिस ऑफ सोशल सायन्सेस डॉक्टरल थिसेस सबमिटेड टु डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद

संकेतस्थळ

1) www.srtmu.ac.in
2) www.ycmou.ac.in
3) www.bamu.ac.in
4) https://ess.inflibnet.ac.in